# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. २९/०३/२०१७.

**प्रेस नोट**

## गुन्हे शाखेने केले हद्दपार असलेल्या आरोपीस जेरबंद.

दि.२९/०३/२०१८- काल दि.२८/०३/२०१८ रोजी गुन्हे शाखेचे सहा पोलीस निरीक्षक अजबसिंग जारवाल हे पथकासह आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत हडको कॉर्नर जवळ आले असता देशमुख चायनीज सेंटर समोर हद्दपार इसम शेख शारुख उर्फ शारेख शेख सलीम वय २१ वर्ष रा.टाऊन हॉल, काजीवाडा भडकलगेट, औरंगाबाद हा हडको कॉर्नर, देशमुख चायनीज सेंटर समोर दिसला त्यास गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने जागीच पकडले. त्याच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार प्रतिबंधक कारवाई म्हणून पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर यांचे आदेशान्वये दोन वर्षा करिता औरंगाबाद शहर व औरंगाबाद जिल्हयातून हद्दपार केले असताना नमूद आरोपी हा कोणतीही पूर्वपरवानगी न घेता औरंगाबाद शहरात वावरताना आढळून आला. यावरून त्याविरुद्ध पोलीस स्टेशन बेगमपुरा येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस पुढील कार्यवाहीकामी पोलीस स्टेशन बेगमपुरा यांच्या ताब्यात दिले.

हि कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक अजबसिंग जारवाल, पोह/शिवाजी झिने, पोना/विलास वाघ, राजेद्र साळुंके, पोकॉ/गजानन मांटे, विलास सोनवणे, प्रभाकर राऊत, सुनील धात्रत, देवचंद महेर,रवी दाबाडे यांनी केली आहे.

SD/-
पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर
करिता